इचलकरंजी महानगरपालिका

मा. प्रशासक ठराव क्र. ०८ / २०२५ (मा . महासभा) दि. २५ /०४/२०२५

---

**प्रस्ताव** : ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शांतता क्षेत्र / झोन घोषित करणे.

संदर्भ :

१) शासन निर्णय क्र.ध्वनी प्र-२०१९/प्र.क्र.९५/ताकं-१, दि.२१/०४/२००९, पर्यावरण विभाग नुसार ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करणेकामी प्राप्त मार्गदर्शन सुचना.

२) शासन निर्णय क्र.२००९/प्र.क्र.१२/०८(भाग)/तां.क.१, दि.२०/११/२०१७ पर्यावरण विभाग नुसार ध्व.प्र.(वि व वि) वित्त, २०१७ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शांतता क्षेत्र / झोन घोषित करणेबाबत मार्गदर्शन सुचना.

३) ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २०००

४) शासन निर्णय क्र.डि.आय.एफ़ ०९१०/प्र.क्र.४३४ वि. शा-१, ब, दि.२८/०७/२०१५, गृह विभाग नुसार ध्वनी प्रदुषण नियम २००० व महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ ची अंमलबजावणी करणेबाबत मार्गदर्शन सुचना

५) शासन निर्णय क्र.-डि.आय.एस ०९१०/प्र.क्र.४३४१ वि, शा-१ ब, दि.१४/०७/२०१५ नुसार ध्वनी प्रदुषणाबाबत पोलिस यंत्रणेकडून करावयाच्या कार्यवाहीबाबत निर्गमित मार्गदर्शक सुचना.

**प्रस्ताव :**

वरील विषयांकितकामी संदर्भ क्र.०१ चे आदेशान्वये ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० अंमलबजावणी करणेकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांनी शहरी भागात शांतता झोन जाहीर करणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये परिशिष्टामध्ये नमुद केले प्रमाणे नगरविकास विभागा अंतर्गत येणा-या महानगरपालिकांसाठी संबंधित महानगरपालिका यांना प्राधिकृत अधिकारी — पदनाम प्राधिकरण म्हणून जाहीर केले असुन सदर प्राधिकरण हे ध्वनी प्रदुषण नियंत्रण व नियमनाची कार्यवाही करण्यास सक्षम असलेबाब्त आदेशित केले आहे. त्यानुसार शहरातील १) शैक्षणिक २) न्यायालये ३) रुग्णालये ४) धार्मिक स्थळे व सक्षम प्राधिकरणद्वारे घोषित केलेली इतर ठिकाणी सभोवताली १०० मी. क्षेत्र शांतता झोन म्हणुन जाहीर करणे संदर्भात आदेशित केले आहे.

संदर्भ क्र.०२ चे निर्णयान्वये वरील नमुद नियमामध्ये सुधारणा होवुन ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने निर्गमीत केलेल्या अधिसुचनेप्रमाणे अंमलबजावणी कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे नमुद केले आहे. त्याप्रमाणे नगरविकास विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील महानगरपालिकांकडुन शांतता क्षेत्र अधिसुचित करणेबात सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच सुधारीत अधिनियमानुसार ध्वनी तिव्रता खालील नमुद केलेल्या ठिकाणांकरीता निश्चित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | क्षेत्र/ परिसर | ध्वनी तिव्रता मर्यादा DB (A) Leq मध्ये | |
|---|---|---|---|
| १ | | दिवस | रात्र |
| १ | औदयोगिक | ७५ | ७० |
| २ | व्यापारी | ६५ | ५५ |
| ३ | रहिवासी | ५५ | ४५ |
| ४ | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

तसेच संदर्भ क्र. ०४ चे शासन निर्णयान्वये गृह विभागामार्फत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानसुार क्र. ध्वनी प्रदुषणाचे उल्लघंन बाबत संबंधित पोलिस अधिकारी यांचे करण्यात येणा-या कार्यवाहीचा महत्वाचे महानगरपालिका आयुक्त यांनी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत सुचविले आहे. त्याप्रमाणे वरील संदर्भीय शासन निर्णयाचे मार्गदर्शक तत्वानुसार इचलकरंजी महानगरपालिका हददीमधील शातंता क्षेत्रे अधिसुचित करणे करीता प्रस्ताव नगरविकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याकरीता इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील शांतता क्षेत्राची क्षेत्र निश्चिती करणेकरीता नगररचना विभागास आदेशित केले असता, नगररचना विभागामार्फत खालील नमुद केलेप्रमाणे शांतता क्षेत्र निश्चित केले आहे.

नगररचना खाते मार्फत प्रस्तावित केलेल्या शांतता क्षेत्रांची यादी

शाळा / हायस्कूल

१. राणी लक्ष्मीबाई विद्यालय
२. विनायक हायस्कूल
३. शहापूर हायस्कूल
४. अहिल्याबाई होळकर विद्यामंदीर
५. श्रध्दा ऑलंपियाड स्कूल
६. आयडियल इंग्लिश मेडियम स्कूल
७. अशोका हायस्कूल

नगरसचिव

PDF Scanner ACE Scanner

८. वेनूताई हेगडेवार स्कूल
९. मणेरे हायस्कूल
१०. पंडीत बाळकृष्ण बुवा विद्यामंदीर
११. जवाहरनगर हायस्कूल
१२. सरस्वती हायस्कूल
१३. मॉडर्न हायस्कूल
१४. दत्ताजीराव कदम आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज
१५. आण्णा रामगोंडा पाटील शाळा
१६. लालबहादूर शास्त्री विद्यामंदीर क्र. ३४
१७. माई बाळविद्यामंदीर
१८. नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यामंदीर
१९. जीजस् इंग्लिश मेडियम स्कूल
२०. आदर्श विद्यामंदीर
२१. इंदिरा गांधी विद्यामंदीर शाळा क्र. १२
२२. व्यंकटराव हायस्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज
२३. डी.के.टी.ई. इंग्लिश मेडियम स्कूल
२४. डी.के.टी.ई. सोसायटी टेक्सटाईल अॅण्ड इंजिनिअरिंग
२५. सन्मती मतीमंद विकास केंद्र
२६. श्री नाकोडा हायस्कूल
२७. मराठी मेडीयम हायस्कूल
२८. कॉ.के.एल. मलाबादे विद्यामंदीर
२९. तात्यासाहेब मुसळे हायस्कूल
३०. डेक्कन इंग्लिश स्कूल

हॉस्पिटल

१. अलायन्स मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
२. इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल
३. आयुष्यमान आरोग्यवर्धीनी हॉस्पिटल
४. निरामय मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल
६. आयुष्यमान आरोग्यवर्धीनी हॉस्पिटल

न्यायालय

१. सह जिल्हा दिवाणी व फौजदारी न्यायालय

तरी नगररचना विभागाने अंतिम केलेप्रमाणे शांतता क्षेत्र निश्चित होणेकामी मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेमार्फत अधिसुचना निर्गमित करणेबाबत प्रस्ताव करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**मा. प्रशासक ठराव क्र. ०८ / २०२५ (मा . महासभा)** **दि. २५ /०४/२०२५**

वरीलप्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिका हददीतील ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शांतता क्षेत्र / झोन अंतर्गत निश्चित करणेकामी नगररचना विभागाने प्रस्तावात नमुद केले शांतता क्षेत्राची यादी अंतिम करणेत येवुन उक्त क्षेत्र शांतता क्षेत्र म्हणुन निश्चित होणे करीताचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेमार्फत अधिसुचना निर्गमित करणेकामी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच या कामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक ते कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहे.

स्वाक्षरी /-
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

खरी नक्कल
नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका

नगरसचिव